MHSO130005952023

नियमित दिवाणी दावा क्र.५००/२०२३
तुकाराम तनपुरे
वि.
दत्तात्रय भोसले

# निशाणी क्र. ११ वर आदेश

प्रतिवादीने त्यांना लेखी कैफीयत दाखल करणेसाठी झालेला विलंब माफ होऊन लेखी कैफीयत दाखल करणेसाठी परवानगी मिळण्याची विनंती केली. त्यांचे असे म्हणणे आहे की, काही महत्वाची व जुनी कागदपत्रे उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांना मुदतीत कैफीयत दाखल करता आली नाही. वादीने सदरचा अर्ज संयुक्तीक नाही, खरा नाही असे म्हणणे मांडले. तसेच अर्जास पुरेसे कारण नाही. सदरचा अर्ज हा मोघम असुन जाणिवपुर्वक प्रकरण लांबवण्यासाठी विलंबाने अर्ज केला आहे म्हणुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०२] वादी व त्यांचे वकील गैरहजर. प्रतिवादीच्या वकिलांना ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादीला वाद समन्स दिनांक १४/१२/२०२३ रोजी प्राप्त झाले. त्यानंतर प्रतिवादी दाव्यात हजर झाले. परंतु त्यांनी मुदतीत लेखी कैफीयत दिली नाही. परंतु सदर दाव्याच्या कामकाजाकरीता नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादींचे म्हणणे ऐकुन घेणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा दावा वादीने आज्ञार्थी व निरंतरची ताकीद हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादीची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास त्यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर घेतल्यास दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीची लेखी कैफीयत दाखल करुन त्यांना प्रकरण बचाव करण्याची संधी देणे गरजेचे आहे. प्रतिवादीने लेखी कैफीयत देणेसाठी ४ महिन्यांपेक्षा जास्त दिवसांचा विलंब केला. म्हणुन सदरचा अर्ज २००/- रुपयांच्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. प्रतिवादीने सदरचा खर्च पुढील तारखेच्या आत वादीला दयावा. सदरचा खर्च वादीला दिल्यानंतरच प्रतिवादीची लेखी कैफीयत अभिलेखावर घेण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SANTOSH BHOLARAM VIJAYKAR
Date: 2025.01.30 17:40:15 +0530

बार्शी
दिनांकः ३०/०१/२०२५

(एस.बी. विजयकर)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), बार्शी.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri.S.R. Barangule |
| (b) | Court | : | Shri.S.B. Vijaykar,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 30/01/2025 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 30/01/2025 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 30/01/2025 |